# पर्यावरण अहवाल

## बि. ए. भाग - २
## सेमीस्टर-४

## जलीय परिसंस्था
## काशीखेड पर्यावरण अहवाल
## २०२३-२०२४

***सादरकर्ती***

कु. ________________________

बि. ए. भाग व्दितीय (सेमी.४)
श्रीराम कला महिला महाविद्यालय
धामणगांव रेल्वे

***मार्गदर्शक***
डॉ. नंदकिशोर राऊत
प्राचार्य
श्रीराम कला महिला महाविद्यालय
धामणगांव रेल्वे

***मार्गदर्शक***
प्रा. अभिजीत दोड
भूगोल विभाग प्रमुख
श्रीराम कला महिला महाविद्यालय
धामणगांव रेल्वे

पर्यावरणदृष्ट्या अतिशय उपयोगी आहे. त्यापासुन मानवी आरोग्याला कुठलीही हानी पोहोचत नाही. परिसरातील कडुनिंब, बाभुळ या झाडावर डिंक निर्मीती करुन तो गोळा केला जातो व बाजारात विक्रीस पाठविला जातो.

या परिसरात भरपुर गवत असल्याने त्यावर जगणारे अनेक तृण भक्षक प्राणी येथे आढळतात. या परिसरात हरिण, नीलगाय, रोही, गायी, बैल, म्हशी, बकरी, मेंढरे, ससा आढळतात. काही व्दितीय भक्षकी येथे आढळतात. उदा. कोल्हा, लांडगा, बिबट्या, साप, बेडुक इत्यादि हे प्राणी तृणभक्षक प्राण्यांना मारुन त्यांचे मास भक्षण करुन उदरनिर्वाह करतात. याशिवाय बहुभक्षी असे चिमणी, कावळा, घार, पोपट, सुतार, घुबड, गिधाड, कोकीळा, कबुतर, बगळा, मोर, लांडोर, माळढोक, खंड्या इत्यादी आढळतात. तसेच लाखोच्या संख्येने विघटक ज्यात जिवाणू, बुरशी, विषाणु सुक्ष्मजीव सेंद्रीय पदार्थाचे विघटन करतात व पर्यावरणात संतुलन ठेवण्याचे कार्य करीत असतात.

थोडक्यात येथील परिसरात उत्पादक तृणभक्षक, व्दितीय भक्षक, तृतीय भक्षक विघटक मोठ्या संख्येने आढळतात. यामुळे परिसंस्था निर्माण होते. अन्नसाखळी तयार होते. उर्जेचा प्रवाह निर्माण होतो.

तिवरा प्रस्तुत पर्यावरण क्षेत्रभेट यासाठी तिवरा येथील गवताळ प्रदेशास निवडण्यात आले. काही शास्त्रज्ञांच्या मते सुमारे

७ कोटी वर्षापुर्वी दख्खनच्या पठारावरील ज्वालामुखी उद्रेकाच्यावेळी येथे ज्वालामुखीय विस्फोट होऊन मोठया प्रमाणात लाव्हा इतरत्र पसरला. कालांतराने तो थंड होवून या टेकडयांची निर्मीती झाली. या टेकडीत बेसॉल्ट खडकांचे अवशेषही आढळतात. तसेच परिसरातील जमिन काळी कसदार असुन ती बेसॉल्ट या खडकापासुनच तयार झाली आहे. म्हणुनच या भुप्रदेशाचा समावेश दख्खनच्या पठारात केला जातो. पोहऱ्याचे डोंगर हे देशातील महत्वाचे जलविभाजक क्षेत्र आहे. कारण या डोंगराच्या पुर्वेकडील बाजुस पडणारे पावसाचे पाणी, ओहळ, नाला, उपनदी, नदी, मोठी नदी असे करित बंगालच्या उसागराला जावुन मिळते तसेच पश्चिमेकडील उतारावर पडणारे पावसाचे पाणी अरबी समुद्रास जावुन मिळते.

या ठिकाणी अनेक टेकडया असल्याने पाण्याचे लहान मोठे प्रवाह येथे आढळतात. परंतु उपनदी किंवा नदी येथे आढळत नाही. प्रत्येक टेकडीवरील पावसाचे पाणी लहान ओहळाच्या स्वरूपात उताराच्या ठिकाणी वाहते. येथील जलप्रवाहांच्या वाहण्याची दिशा ही पश्चिम–पुर्व असल्याने हे जलग्रहण क्षेत्र वर्धा नदीचे असुन ते सर्व पाणी शेवटी पुर्ववाहिनी नदीव्दारे बंगालच्या उपसागरात व गोदावरी नदीत विलीन होते.

या पर्यावरण भेटीसाठी आम्ही बि.ए.भाग–२ च्या सर्व विद्यार्थ्यांनींनी नियोजन केले. काशीखेड गावातील नागरीकांच्या भेटी घेतल्या. त्यांना या परिसरातील माहिती विचारली व पर्यावरणीय अवनतीबाबत त्यांना जागृत करून पर्यावरणाचा ऱ्हास कसा थांबविता येईल याविषयी चर्चा केली.

# निष्कर्ष

- काशीखेड परिसरातील गवताळ प्रदेशात मोठया प्रमाणात वृक्षतोड झालेली दिसुन आली.

- या परिसरातील टेकडयावर वृक्षतोड झाल्याने मोठया प्रमाणात मृदेची धुप झालेली दिसुन येते.

- अती गुरे चराईमुळे या टेकडया पर्णहीन व बोडख्या झाल्या आहेत.

- येथील वृक्षतोडीमुळे अनेक पशुपक्षांचे आश्रय स्थान म्हणजे त्यांची घरटी यांचे अस्तित्व धोक्यात आलेले आहे.

- येथे जास्तीत जास्त जमिन लागवडीखाली आणत असल्याने वनाच्छादनाचे प्रमाण घटत आहे.

- गेल्या काही वर्षात रस्ते निर्मीती, रोड रूंदीकरण यामुळे स्थानिक पर्यावरणास हानि पोहचत आहे.

- या परिसरात भुजलाच्या अतिवापर शेतीसाठी करित असल्याने दिवसेंदिवस भुजल पातळी खुप खोल जात आहे.

## उपाययोजना

- या गवताळ प्रदेशात विविध घटकाद्वारे मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याची आवश्यकता आहे.

- येथील गवताळ प्रदेशावर चर खोदुन मातीचे बांध घालुन पाणी अडविणे आवश्यक आहे. जेणे करुन डोंगरावरील हिरवळ वाढेल.

- गुरे चराई नियंत्रीत करुन मृदेची धुप कमी करता येईल.

- येथील लहान मोठ्या जलप्रवाहावर बंधारे निर्माण केल्यास भुजल पातळी उंचावेल व गुराढोरांना पशु-पक्षांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता होईल.

- येथील शेत जमिन उतार पाटी असल्याने शेतकऱ्यांनी उताराला आडवी अशी नांगरणी व पेरणी करावी. जेणे करुन पावसाच्या वेळी मृदेची धुप कमी होईल व पावसाचे जास्तीत जास्त पाणी वाहुन न जाता जमिनीत जिरेल.

## पर्यावरण क्षेत्र भेट
## जलीय परिसंस्था, काशीखेड

